।। सा विद्या या विमुक्तये ।।

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

**Phone: (02462) 215294** **EXAMINATION DEPARTMENT** **Website: srtmun.ac.in**

**email : directorboee@srtmun.ac.in**


संदर्भ : परीक्षा विभाग/वाणिज्य/२०२२-२३/१३६ दिनांक : ०२/०५/२०२३

प्रति,

मा.प्राचार्य,
सर्व संलग्नीत एम.बी.ए. महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय : एम.बी.ए. जुन्या (सिजीपिए) अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना नवीन (सिबीसिएस) अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षेच्या संधी देणेबाबत.....**

**संदर्भ :** १) शैक्षणिक-०१/परिपत्रक/पदव्युत्तर CBCS अभ्यासक्रम/२०१८-१९/१०१५, दिनांक २०/०८/२०१८.
२) परीक्षा/वाणिज्य/२०२०-२१/१२७, दिनांक ०२/०२/२०२१.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यांत येते की, संदर्भ क्रमांक १ नुसार **एमबीए प्रथम व द्वितीयवर्ष वर्गासाठी (CBCS) सुधारीत अभ्यासक्रम लागू** करण्यांत आलेला आहे. त्यामुळे एमबीए पदव्युत्तर जुना (CGPA) अभ्यासक्रमातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी ३ संधी त्या त्या वर्षी देण्यांत आलेल्या आहेत. त्यानंतरही जे विद्यार्थी जुन्या अभ्यासक्रमात अनुत्तीर्ण होते त्यांना उत्तीर्ण होण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून टप्प्याटप्प्याने अनुक्रमे प्रथम व द्वितीय वर्ष वर्गासाठी लागू झालेल्या नवीन अभ्यासक्रमातील विषय हे समकक्ष विषय म्हणून संदर्भ क्रमांक २ नुसारच्या पत्राप्रमाणे देण्यांत आलेले आहेत. **संदर्भ क्रमांक २ नुसार देण्यांत आलेली समकक्षता ही संदर्भ क्रमांक १ नुसार सुधारीत झालेला अभ्यासक्रम अस्तीत्वात असे पर्यंतच लागू राहतील**. त्यानंतर मात्र एमबीए पदव्युत्तर जुना (CGPA) अभ्यासक्रमातील विद्यार्थी अजूनही एक किंवा अधिक विषयात अनुत्तीर्ण असतील तर त्यांनी संदर्भ क्र. १ नुसारचा **अभ्यासक्रम बदलल्यानंतर जो कोणता अभ्यासक्रम लागू असेल त्या अभ्यासक्रमातील त्या-त्या वर्गातील अंतर्गत, एस.ई.सी.प्रात्यक्षिक, प्रोजेक्ट व ईतर जे विषय असतील असे सर्व विषय घेवून पुन्हा परीक्षा द्यावी लागेल.**

याबाबतची माहिती विद्यार्थ्यांना व सर्व संबंधितांना अवगत करून देण्यांत यावी. जेणे करून परीक्षा आवेदनपत्र भरतांना चूका होणार नाहीत.

**संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

याची एक प्रत :
१) मा. कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्रे, प्रस्तुत विद्यापीठ.
४) सहा.कुलसचिव, शैक्षणिक विभाग (अभ्यासमंडळ), प्रस्तुत विद्यापीठ.